**व्याकरणिक विशेष : तृतीय पुरुष एकवचन नामाच्या लिंगाशी क्रियापदाचा सुसंवाद**

प्रमाण मराठीतील 'कासव जिंकतं, ससा हरतो आणि गोष्ट संपते' या अपूर्ण क्रियाव्याप्ती दर्शविणाऱ्या वाक्यात 'जिंकतं', 'हरतो' आणि 'संपते' या क्रियापदांचा अनुक्रमे 'कासव (नपुंसकलिंग)', 'ससा (पुल्लिंग)' आणि 'गोष्ट (स्त्रीलिंग)' या तृतीय पुरुष एक वचनातील (तृ.पु.ए.व.) नामांच्या लिंगाशी सुसंवाद असल्याचे दिसते. मराठीच्या काही प्रादेशिक बोलींमध्ये अपूर्ण क्रियाव्याप्ती दर्शविणाऱ्या वाक्यांमध्ये हा सुसंवाद पर्यायाने (काही वेळा) होत नसल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की एकाच व्यक्तीच्या / गावातील बोलीप्रकारात 'मुलगा पळतो, मुलगी पळते' आणि 'मुलगा पळते, मुलगी पळते' अशा दोन्ही प्रकारच्या रचना आढळतात.

**१.0 व्याकरणिक विशेषाची नोंद**

सदर व्याकरणिक विशेषाच्या संदर्भात मराठीच्या विविध बोलींमध्ये २ पर्यायी रचना आढळल्या आहेत : अपूर्ण क्रियाव्याप्ती दर्शविणाऱ्या वाक्यातील क्रियापदाचा तृ.पु.ए.व. नामाच्या (१) लिंगाशी सुसंवाद होतो, (२) पर्यायाने (काही वेळा) लिंगाशी सुसंवाद होतो. या पर्यायी रचनांचा भौगोलिक प्रसार व उदाहरणे पुढे दिली आहेत.

**१.१ पर्याय १ : लिंगाशी सुसंवाद होतो**

सदर पर्याय सर्वेक्षणातील एकूण ३४ जिल्ह्यांपैकी १९ जिल्ह्यांमध्ये आढळला आहे. या पर्यायाचा भौगोलिक प्रसार व उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| कोल्हापूर | करवीर - गडमुडशिंगी व खुपिरे, शाहुवाडी - शाहुवाडी व खुटाळवाडी, कागल - गोरांबे व एकोंडी, चंदगड - चंदगड, तुडिये व कोदाळी, राधानगरी - सोन्याची शिरोळी, गडहिंग्लज - हेब्बाळ जलद्याळ व इंचनाळ |
| सांगली | मिरज - सोनी व म्हैसाळ, शिराळा - पाचुंब्री व शिराळा (खुर्द) |
| सातारा | खटाव - मांडवे, विसापूर व म्हासुर्णे, पाटण - म्हावशी व हेळवाक, सातारा - चाळकेवाडी व कोडोली, वाई - चिखली व पांडेवाडी |
| सोलापूर | सोलापूर - रानमसले, डोणगाव व नांदनी, अक्कलकोट - कर्जाळ, सांगोले - हांगिर्गे, हातिद, सांगोले व कटफळ, बार्शी - गौडगाव व सौंदरे |
| उस्मानाबाद | उस्मानाबाद - शिंगोली व कोंड, उमरगा - जकेकूर व कसगी |
| लातूर | लातूर - पाखरसांगवी, तांदुळजा व बाभळगाव, निलंगा - दादगी व मानेजवळगा, उदगीर - शिरोळ जानापूर व मलकापूर |
| नांदेड | नांदेड - लिंबगाव व पांगरी, किनवट - इस्लापूर, मुखेड - हळणी |
| परभणी | पालम - बनवस, सोनपेठ - तिवठणा, परभणी - टाकळगव्हाण |
| बीड | बीड - बेडूकवाडी व कोल्हारवाडी, शिरूर-कासार - दहिवंडी, आंबेजोगाई - सातेफळ व दरडवाडी |
| जालना | जालना - धावेडी, मंठा - उसवद व तळणी व केंधळी |
| औरंगाबाद | औरंगाबाद - भिकापूर-नायगाव व पिंपळखुंटा, वैजापूर - नांदगाव व सावखेडगंगा, पैठण - तेलवाडी व पाचोड (बुद्रुक), सोयगाव - घोसला व पळसखेडा |

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

| | |
|---|---|
| जळगाव | जळगाव - धामणगाव, जामनेर - वाघारी, रावेर - मांगलवाडी |
| नाशिक | नाशिक - मडसांगवी, पळसे व विल्होळी, सटाणा - मुल्हेर,<br>सुरगणा - काठीपाडा व सुरगणा, त्र्यंबकेश्वर - गोलदरी व झारवड (खुर्द),<br>येवला - बोकटे व निमगावमढ |
| अहमदनगर | अकोले - ब्राह्मणवाडा व डोंगरगाव, नेवासा - खलालपिंपरी व मोरगव्हाण,<br>अहमदनगर - कामरगाव व नारायण डोहो , जामखेड - सावरगाव व जवळके |
| पुणे | हवेली - जांभळी व केसनंद, इंदापूर - सराफवाडी व सरडेवाडी,<br>जुन्नर - बोरी (बुद्रुक) व धामणखेल, मुळशी - कासार-आंबोली व निवे |
| पालघर | वसई - सायवन, डहाणू - मुरबाड व पिंपळशेत, जव्हार - हातेरी व खंबाळा,<br>मोखाडा - दांडवळ व कारेगाव |
| ठाणे | अंबरनाथ - वांगणी, भिवंडी - भिवाली व खोणी, मुरबाड - मढ व पाटगाव,<br>शहापूर - बोरशेती-कळंबे व चौंढे (बुद्रुक), ठाणे - येऊर |
| रायगड | कर्जत - गौळवाडी, अलीबाग - बापळे व मांडवा-बोडनी,<br>रोहा - नागोठणे व चिंचवली, श्रीवर्धन - श्रीवर्धन, महाड - नरवण |
| रत्नागिरी | रत्नागिरी - मालगुंड, झाडगाव व सोमेश्वर, खेड - सवणस, जामगे व बहिरवली,<br>दापोली - दाभोळ व पालगड, राजापूर - मंद्रूळ व सोलगाव |

**१.१.१ उदाहरण** (जि. परभणी, ता. परभणी, गाव टाकळगव्हाण, पु२१, मराठा, बी.कॉम.)

ससा **पळतो** फुडी गवत खातो **थांबतो झ़ोपतो**

səsa **pəḷto** pʰuḍi gəwət kʰato **tʰambto jʰopto**

səsa **pəḷ-t-o** pʰuḍi gəwət kʰa-t-o **tʰamb-t-o jʰop-t-o**

rabbit.3SGM **run-IPFV-3SGM** ahead grass.3SGN eat-IPFV-3SGM stop-IPFV-3SGM sleep-IPFV-3SGM

The rabbit runs ahead and eats grass then stop and sleeps.

**१.१.२ उदाहरण** (जि. रायगड, ता. अलिबाग, गाव बापळे, पु२८, आगरी, १०वी)

तवपासून ती आता भईन तितं ती **ऱ्हाते**

təwpasun ti ata bʰəin titə **rʰate**

təwpasun ti ata bʰəin titə **rʰa-t-e**

from that DEM.DIST.3SGF now sister.3SGF there stay-IPFV-3SGF

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

Sister has been living there ever since.

**१.१.३ उदाहरण** (जि. पुणे, ता. जुन्नर, गाव धामणखेल, पु३३, महादेव कोळी, ८वी)

ती बाई तिच्या शेज़ारच्याला **सांगती** ना

ti bai tiča šejarčala **saṅgəti** na

ti bai ti-č-a šejar-č-a-la **saṅgə-t-i** na

DEM.DIST.3SGF woman.3SGF she-GEN-OBL neighbouring-GEN.3SGM-OBL-ACC **tell-IPFV-3SGF** PRT

The woman tells her neighbour.

**१.१.४ उदाहरण** (जि. सातारा, ता. खटाव, गाव मांडवे, स्त्री३५, माळी, ७वी)

कासव **जिंकतं** आनि ससा हारतो

kasəw **ǰiṅktə** ani səsa harto

kasəw **ǰiṅk-t-ə** ani səsa har-t-o

tortoise.3SGN **win-IPFV-3SGN** and rabbit.3SGM lose-IPFV-3SGM

Tortoise wins the race and rabbit loses.

### १.२ पर्याय २ : पर्यायाने (काही वेळा) लिंगाशी सुसंवाद होतो

सदर पर्यायी रचना सर्वेक्षणातील एकूण ३४ पैकी २६ जिल्ह्यामध्ये आढळली आहे. या पर्यायी रचनेचा भौगोलिक प्रसार व उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| चंद्रपूर | चंद्रपूर - चकनिंबाळा व दाताळा, राजुरा - कढोली (बुद्रुक) व कोष्टाळा, ब्रह्मपुरी - पांचवाव व तोरगाव (बुद्रुक) |
| गडचिरोली | गडचिरोली - खुर्सा व शिवणी, कोरची - बोरी व मोहगाव |
| गोंदिया | गोंदिया - टेमनी व तेढवा, सडक अर्जुनी - डुग्गीपार व चिखली |
| भंडारा | भंडारा - धारगाव व मुजबी, तुमसर - लोभी व बोरी |
| नागपूर | नागपूर - येरला व सोनेगाव (लोधी), भिवापूर - सावरगाव व बोटेझरी, रामटेक - भोजापूर व करवाही, नरखेड - उमरी व पांढरी |
| वर्धा | वर्धा - करंजी (भोगे) व निमगाव (सबने), आष्टी - खडका व थार, |

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

| | |
|---|---|
| | हिंगणघाट - अजंती व पोती, सेलू - वडगाव जंगली व झडशी |
| यवतमाळ | घाटंजी - खापरी व कुर्ली, नेर - कोलुरा व दगड धानोरा |
| अमरावती | अमरावती - सावर्डी व मलकापूर, वरूड - सातनूर व गाडेगाव,<br>दर्यापूर - भांबोरा, जितापूर व भामोद, धारणी - कावडाझिरी |
| अकोला | अकोला - गोपाळखेड व येवता |
| वाशिम | वाशिम - शिरपूटी, रिसोड - चाकोली व घोणसर, कारंजा - गिरडा व दोनद (बुद्रुक) |
| हिंगोली | हिंगोली - कारवाडी, कळमनुरी - बाभळी व मोरवड |
| नांदेड | किनवट - मारेगाव (खालचे), मुखेड - शिरूर (दबडे), देगलूर - खानापूर व रमतापूर |
| परभणी | पालम - कापसी, सोनपेठ - डिघोळ |
| बीड | शिरूर-कासार - टाकळवाडी |
| सोलापूर | अक्कलकोट - कुरनूर व चिक्केहळ्ळी |
| बुलढाणा | बुलढाणा - पळसखेड भट व वरवंड, जळगाव-जामोद - वडगाव पाटण व<br>निमकराड, शेगाव - शिरजगाव (निळे) व पाडसूळ |
| जळगाव | जळगाव - वडली, जामनेर - वाकोद, रावेर - निरूळ, चाळीसगाव - हातले व<br>दहिवद, चोपडा - तांदळवाडी व वैजापूर |
| धुळे | धुळे - लळींग, सोनगीर, खेडे व शिरूड-खोरदड,<br>शिरपूर - आंबे, शिंगावे व बोराडी, साक्री - दिघावे व धाडणे |
| नंदुरबार | नंदुरबार - घोटाणे व धानोरा, नवापूर - खांडबारा व चिंचपाडा,<br>शहादा - प्रकाशा व शहादा |
| नाशिक | मालेगाव - कळवाडी व कौळाणे (गा.), सटाणा - देरेगाव |
| पालघर | वसई - वाघोली, कळंब व निर्मळ, डहाणू - बोर्डी व वेती, तलासरी - उधवा |
| ठाणे | अंबरनाथ - उसाटणे |
| रायगड | कर्जत - साळोख, मुरूड - एकदरा व चिंचघर, श्रीवर्धन - बागमांडला |
| रत्नागिरी | राजापूर - कुंभवडे |
| सिंधुदुर्ग | दोडामार्ग - आयी व माटणे, मालवण - कट्टा, देऊळवाडा व दांडी,<br>कुडाळ - आम्रड, मानगाव व कुडाळ, वेंगुर्ला - वेंगुर्ला, देवगड - तारामुंबरी व<br>जामसंडे, वैभववाडी - नादवडे, सावंतवाडी - कोलगाव व सातर्डे |
| कोल्हापूर | राधानगरी - ओलवण |

**१.२.१ उदाहरण** (जि. अमरावती, ता. अमरावती, गाव सावर्डी, स्त्री१९, महार, १२वी)

शेवटी **ससाच्च जिकतो** कासव थोडीच्च जिकतं ते

šewṭi səsac **ǰikto** kasəw tʰoḍic ǰiktə te

šewṭi səsa-c ǰik-**t-o** kasəw tʰoḍi-c ǰik-t-ə te

lastly raabit-EMPH win-IPFV-**3SGM** tortoise.3SGN little-EMPH win-IPFV-3SGN DEM.DIST.DIST.3SGN

Finally, rabbit wins (the race), tortoise does not win.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत. परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

**१.२.२ उदाहरण** (जि. अमरावती, ता. अमरावती, गाव सावर्डी, स्त्री१९, महार, १२वी)

वाघ म्हनते मी तुला खाइन **ससा म्हनते** नाही रे माझा छोटासा पिलू हाय तू कशाला मला खातो

wagʰ mʰənte mi tula kʰain səsa **mʰənte** nahi re majʰa čʰoṭasa pilu hay tu kəšala məla kʰato

wagʰ mʰən-t-e mi tu-la kʰa-in səsa **mʰən-t-e** nahi re ma-jʰ-a čʰoṭasa pilu hay tu kəšala mə-la kʰa-t-o

tiger.3SG say-IPFV-3SG I you-ACC eat-FUT rabbit.3SG **say-IPFV-3SG** NEG VOC I-GEN-3SGM little.OBL.3SGM kid.3SGM be.PRS you why I-ACC eat-IPFV-2SGM

Tiger says to rabbit, "I will eat you." Rabbit says, "Please don't eat me; I have a kid. Why do you want to eat me?"

**१.२.३ उदाहरण** (जि. अमरावती, ता. अमरावती, गाव सावर्डी, स्त्री१९, महार, १२वी)

माझी आइ **म्हनते** बा तु म्हनते असा नाही मुलगा तसा नाही कसा भेटन

majʰi ai **mʰənte** ba tu mʰənte əsa nahi mulga təsa nahi kəsa bʰeṭən

ma-ǰʰ-i ai **mʰən-t-e** ba tu mʰən-t-e əsa nahi mulga təsa nahi kəsa bʰeṭ-ən

I-GEN-3SGF mother.3SGF **say-IPFV-3SG** VOC you say-IPFV-2SGF thus.3SGM NEG boy.3SGM thus.3SGM NEG how.3SGM meet-FUT

My mother says (to me), "You say you don't want a groom like this, like that then how would you find a groom?"

**१.२.४ उदाहरण** (जि. अमरावती, ता. अमरावती, गाव सावर्डी, स्त्री१९, महार, १२वी)

शेवटी ससाच जिकतो कासव थोडीच **जिकतं** ते

šewṭi səsac ǰikto kasəw tʰoḍic **ǰiktə** te

šewṭi səsa-c ǰik-t-o kasəw tʰoḍi-c **ǰik-t-ə** te

lastly raabit-EMPH win-IPFV-3SGM tortoise.3SGN little-EMPH **win-IPFV-3SGN** DEM.DIST.DIST.3SGN

Finally, rabbit wins (the race), tortoise does not win.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत. परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

**१.२.५ उदाहरण** (जि. अमरावती, ता. अमरावती, गाव सावर्डी, स्त्री१९, महार, १२वी)

कासव **मनते** की मी जिकतो

kasəw **mənte** ki mi ǰikto

kasəw **mən-t-e** ki mi ǰik-t-o

tortoise.3SG say-IPFV-3SG COMP I win-IPFV-1SGM

The tortoise says, "I will win the race".

**१.२.६ उदाहरण** (जि. चंद्रपूर, ता. ब्रह्मपूरी, गाव तोरगाव (बुद्रुक), पु२२, राजगोंड, १०वी)

ससा हडू हडूस च़ाल्ला **ज़ातो**

səsa həḍu həḍus calla **jato**

səsa həḍu həḍu-s cal-l-a **ja-t-o**

rabbit.3SGM slowly slowly-EMPH walk-PFV-3SGM go-IPFV-3SGM

The rabbit goes slowly slowly.

**१.२.७ उदाहरण** (जि. चंद्रपूर, ता. ब्रह्मपूरी, गाव तोरगाव (बुद्रुक), पु२२, राजगोंड, १०वी)

ससा ज़ाऊन **पाअते**

səsa jaun **paəte**

səsa ja-un **paə-t-e**

rabbit.3SGM go-CP **see-IPFV-3SG**

The rabbit goes and looks.

**१.२.८ उदाहरण** (जि. चंद्रपूर, ता. ब्रह्मपूरी, गाव तोरगाव (बुद्रुक), स्त्री८०, कुणबी, २री)

ही बाइ आय का **सांगते** का आता

hi bai ay ka **saṅgte** ka ata

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत. परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

hi bai ay ka **saṅg-t-e** ka ata

DEM.PROX.3SG woman be.PRS what tell-IPFV-3SG what now

There is this woman, what does she say now?

**१.२.९ उदाहरण** (जि. चंद्रपूर, ता. ब्रह्मपूरी, गाव तोरगाव (बुद्रुक), पु२२, राजगोंड, १०वी)

**कासव** आपलं हडु हडु **जातं**

kasəw aplə həḍu həḍu **ǰatə**

kasəw aplə həḍu həḍu ǰa-t-ə

tortoise we.SELF slow REDUP go-IPFV-3SGN

The tortoise goes slowly.

**१.२.१० उदाहरण** (जि. चंद्रपूर, ता. ब्रह्मपूरी, गाव तोरगाव (बुद्रुक), पु२२, राजगोंड, १०वी)

**कासव** जिंकुन **ज़ाते**

kasəw ǰiṅkun **jate**

kasəw ǰiṅk-un ja-t-e

tortoise win-CP GO-IPFV-3SG

The tortoise wins the (race).

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.